रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी

**ता.माण जि.सातारा**



## राष्ट्रीय सेवा योजना

विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे आदर्श गाव किरकसाल

ता.माण जि. सातारा

१८ जानेवारी २०२५ ते २४ जानेवारी २०२५

## शिबिर अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे आदर्श गाव किरकसाल येथे दिनांक १८ जानेवारी २०२५ ते २४ जानेवारी २०२५ या कालावधीत संपन्न झाले. या राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन दिनांक १८ जानेवारी २०२५ डॉ.प्राचार्य एल.डी.कदम साहेब डी.पी.भोसले कॉलेज कोरेगाव यांचे हस्ते व मा.प्राचार्य डॉ.एस.टी.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.यावेळी आदर्श गाव किरकसालच्या सरपंच मा.सौ.शोभा रामचंद्र कुंभार,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ हजर होते. शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. वृक्षांना आळी करणे, मल्चिंग करणे, पाणी घालणे, शाळेच्या परिसरामध्ये खड्डे खोदणे, मुरूम पसरविणे, बागकाम, वणवा लागू नये म्हणून अग्नी रेषा आखण्याचे काम केले, परिसर भ्रमंती,खजुर शेती भेट,चंदन शेती भेट ,कुक्कुटपालन भेट, स्वच्छता, तसेच एच.आय.व्ही एड्स तपासणी, बी.एम.आय. तपासणी, आपत्ती व्यवस्थापन, प्लास्टिक मुक्ती मोहीम तसेच जैवविविधता जनजागृती, आजचा युवक, मानसिक आरोग्य, मतदारांची कर्तव्ये, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी महत्वपूर्ण व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप दिनांक २४ जानेवारी २०२५ मा.श्री.सहदेव गुरव, मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय किरकसाल यांचे हस्ते व मा. प्र.प्राचार्य डॉ.एस.एम.खेत्रे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी किरकसाल गावच्या सरपंच मा.सौ. शोभा रामचंद्र कुंभार, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ हजर होते. महाविद्यालयातील प्राध्यापक व ग्रामस्थ उपस्थित होते.शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.के.एस.शिंदे व प्रा.एच.जी.कायंदे व राष्ट्रीय सेवा योजनेचे सदस्यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाधिकारी

प्राचार्य

प्र. प्राचार्य,
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.